# ‘सर्वांना सामाजिक आणि आर्थिक न्याय’ ह्या ध्येयाने प्रेरित संस्था - महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका):

महाराष्ट्र फाउंडेशन(अमेरिका) (म. फा.) या संस्थेच्या २००९च्या सर्वसाधारण वार्षिक सभेत नवीन कार्यकारिणीची निवड होऊन अध्यक्ष पदावर डॉ. (सौ.) अरुंधती विनोद यांची नियुक्ती झाली आहे.

अमेरिकेत रॉचेस्टर, (न्यूयॉर्क) येथे १९७७ मध्ये सुमारे दहा मराठी कुटुंबांनी एकत्रित येऊन विना नफा तत्वावर महाराष्ट्र फाउंडेशन (अमेरिका) ह्या लोककल्याणार्थ (charitable) संस्थेची स्थापना केली. तेव्हापासून गेली ३२ वर्षे अनेक सामाजिक प्रकल्पातून शिक्षण, तांत्रिक सोयी, स्वास्थ्य, आर्थिक सशक्तिकरण, पर्यावरण, स्त्रियांचे मूलभूत हक्क याबाबत ही संस्था कार्यरत आहे. भारतात व अमेरिकेत, नैसर्गिक आपत्कालीन प्रसंगीही संस्थेने मदतीचा हात पुढे केला आहे. आतापर्यंत अमेरिकेतील सुमारे १००० उदार व्यक्तींनी महाराष्ट्र फाउंडेशनच्या माध्यामातून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, गुजरात ह्या राज्यातील आणि अमेरिकेतील काही लोककल्याणार्थ संस्थांनाही मदतस्वरूपी देणग्या दिल्या आहेत. वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यापार, वाणिज्य, कायदा वित्त शिक्षण, कला इत्यादि अनेक क्षेत्रातील तज्ञ, व मान्यवर व्यक्ती महाराष्ट्र फाउंडेशनच्या माध्यमातून १००% स्वयंसेवक भावनेने काम करीत आहेत.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या अध्यक्ष – डॉ. (सौ.) अरुंधती विनोद यांनी संस्थेच्या अनेक प्रकल्पांची माहिती देतांना सांगितले की – सामाजिक उन्नतीसाठी– एक खेडेगाव– एक संगणक, ‘भारत वैद्य’ (Barefoot Doctors), बालकल्याण योजना, समाजप्रबोधक साहित्य आणि उल्लेखनीय समाजकार्याबद्दल वार्षिक पुरस्कार, अमेरिकेत MAYTRIN (Empathetic श्रोता/संवादातून सशक्तीकरण) असे अनेक उपक्रम महाराष्ट्र फाउंडेशन राबवत आहे.

महाराष्ट्र फाउंडेशनचा सध्याचा एक उल्लेखनीय प्रकल्प आहे– ‘खेडकर हॉस्पिटल’. रत्नागिरी जिल्ह्यातील अंजवेल गावी, राजकुमार खेडकर यांच्या भरगोस योगदानाने व महाराष्ट्र फाउंडेशनच्या उपक्रमातून एक नर्सिंग होम आणि बाह्य रुग्ण विभागाचे जानेवारी २००९ मध्ये उद्घाटन झाले. तसेच 20 बेड्सची सोय असलेल्या रुग्णालयाचे कार्यही लौकरच सुरू होत आहे.

स्थानिक आणि आंतर्देशीय रोटरी क्लबच्या सहाय्याने ४२ शाळांमधे सुरक्षित आणि स्वच्छ पिण्याच्या पाण्याची यंत्रणा बसवून आतापर्यंत ह्या योजनेचा सुमारे १०,००० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र फाउंडेशनने लाभ मिळवून दिला आहे. यापुढेही अनेक गरजू शाळांमधे स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून देण्याचा म. फा. चा विचार आहे.

मानव तस्करी विरोध योजना (Anti Human Trafficking Project) अंतर्गत – ग्रामीण लोकविकास संस्था (People’s Institute of Rural Development (PIRD), ‘बालसुरक्षा’, save the children (India), ‘अपने आप’ अशा प्रकल्पातून आतापर्यंत ‘रेड लाईट’ वस्तीतील अनेक महिला व बालकांना शिक्षण, पोषण, आरोग्य, रोजगार, व्यक्तित्व विकास, स्वास्थ्य व समर्थ नागरिक बनविण्यामध्ये महाराष्ट्र फाउंडेशनने पुढाकार घेतला आहे. याशिवाय ग्रामीण विभागात जेष्ठ नागरिकासांठी– पुण्याजवळ ‘जनसेवा फाउंडेशन’ द्वारा ९ खेड्यांमधे आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी शिबिरे, काही लहान शस्त्रक्रिया तसेच जेष्ठ नागरिकांसाठी मदतगट, व नेटवर्क निर्माण करण्यास महाराष्ट्र फाउंडेशन प्रयत्नशील आहे.

‘सर्वांना सामाजिक आणि आर्थिक न्याय!’ हे महाराष्ट्र फाउंडेशनचे घोषवाक्य आहे. त्यानुसार यापुढेही या संस्थेचे कार्यकर्ते ‘उदारचरितानां वसुधैव कुटुंबकम्’ ह्या भावनेने, महाराष्ट्रात आणि अमेरिकेत सेवाभावी सामाजिक प्रकल्प अंमलात आणतील यात शंका नाही.

महाराष्ट्र फाउंडेशनच्या कार्याबद्दल अधिक माहिती साठी, महाजालावर (इंटरनेटवर) *http://maharashtrafoundation.org/* या संकेतस्थळास (वेबसाईटला) कृपया भेट द्यावी.

**डॉ. विनता कुलकर्णी**
**पिओरिया, इलिनॉय**